पहा— 1. वित्तीय अधिकार नियम पुस्तीका 1978 मधील भाग पहिला उपविभाग एक मधील नियम क्रमांक 146 अनु.क्र.22.
2.. विधी व न्याय विभाग,मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई 400 032 दिनांक— 03 नोव्हेंबर,2018.
3. दिनांक 08.10.2018 रोजीची कार्यालयीन टिप्पणी.

आ दे श

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 मधील भाग पहिला ,उपविभाग एक मधील नियम कमांक 146 अनु.क.22 नुसार प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ,उस्मानाबाद हे खालील प्रमाणे आदेश निर्गमित करतात.

विधी व न्याय विभाग मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई 400 032 दिनांक 03 नोव्हेंबर,2018 मध्ये नमुद केलेल्या निर्देशानुसार उस्मानाबाद जिल्हा न्यायालयाचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील शार्प कंपनीच्या एकूण 07 जुन्या झेरॉक्स मशिन ह्या 10 वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या खरेदी केलेल्या कालबाहय झाल्याने खालील नमुद झेरॉक्स मशिन निर्लेखित करण्यात येत आहेत..

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | मशिनची संख्या | मशिनचे वर्णन | मुळ किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय,उमरगा | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |
| 2 | सह दिवाणी न्यायालय,क.स्तर,उमरगा | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |
| 3 | दिवाणी न्यायालय,क.स्तर,तुळजापूर | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |
| 4 | दिवाणी न्यायालय,क.स्तर,लोहारा | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |
| 5 | स्ह दिवाणी न्यायालय,क.स्तर,भूम | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |
| 6 | सह दिवाणी न्यायालय,क.स्तर,परंडा | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |
| 7 | मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,उ—बाद | 01 | शार्प अेआर 5320ई | 69,355 |

प्रस्तूतचे वरिल 07 शार्प झेरॉक्स मशिनची उपरोक्त शासन निर्णयानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद ()
0
दिनांक— फेब्रूवारी,2019. ()

( ओमप्रकाश प.जयरवाल )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
उस्मानाबाद.

जा.क्र. /रोविले / 9853/2019

दिनांक— ~~फेब्रुवारी~~ 5 मार्च .2019.

याची एक प्रत माहीती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.
सहा. अधिक्षक.रोविले विभाग.जिल्हा न्यायालय.उस्मानाबाद

## जिल्हा व सत्र न्यायालय,उस्मानाबाद.

जा.क्र.भांडार/ ९६५४/2019
जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद.
दिनांक– ५ /03/2019

### जाहीर सूचना

मा. जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील शार्प कंपनीच्या 2008 रोजी खरेदी केलेल्या जुन्या 07 झेरॉक्स मशिन विक्री करावयाच्या आहेत.

सोबत झेरॉक्स मशिनची यादी असून नमूद झेरॉक्स मशिन या कार्यालयामध्ये दिनांक ५/03/2019 पासून ते दिनांक १४/03/12019 पर्यंत सकाळी 11.00 ते 5.00 वाजेपर्यंत पाहता येतील.

तरी इच्छूक खरेदीदारांनी नमूद अटी व शर्तीनुसार उपरोक्त नमूद कालावधी व वेळेमध्येच सिलबंद दरपत्रके या कार्यालयात सादर करावीत.

सोबत– झेरॉक्स मशिनची यादी.

( ओमप्रकाश प.जयस्वाल )
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
उस्मानाबाद.

### नियम व अटी:

1. सादर केलेले दरपत्रक हे सोबत जोडलेल्या झेरॉक्स मशिन दराबाबत असावे.
2. खरेदीदाराने दरपत्रकासोबत आधारकार्ड/पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.
3. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
4. दरपत्रक मान्य /अमान्य अथवा पूर्णपणे रदद करण्याचे सर्व अधिकार कार्यालयानी राखून ठेवले आहेत.
5. अधिकतम दर सादर करणा–या खरेदीदारास कळविण्यात आल्यानंतर सबंधीतांनी पुढील 05 दिवसाचे आत ( सुटटीचे दिवस वगळून ) दरपत्रकातील नमूद खरेदी रकमेचा भरणा दिलेल्या सुचनेप्रमाणे चलनाद्वारे नियोजित खात्यावर किंवा कार्यालयात रोख जमा करून त्याची प्रत लेखी टिपणीसह या कार्यालयात सादर करावी. यानंतरच खरेदी केलेल्या 07 झेरॉक्स मशिन घेवून जाण्यास लेखी परवानगी देण्यात येईल.

6. मुददा क.5 प्रमाणे खरेदीदारास झेरॉक्स मशिन खरेदीची रक्कम भरणेबाबत अवगत केलेनंतर मुदतीत रक्कम न भरल्यास देण्यात आलेले आदेश रदद करण्यात येतील .

7. मुददा क.5 ची पुर्तता केल्यानंतर निरूपयोगी झेरॉक्स मशिन 07 दिवसाचे आत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्याव्यात. तदनंतर प्रती दिन रूपये 100/– दंड आकारण्यात येईल. 10 दिवसाचे आत मशिन ताब्यात न घेतल्यास मान्य दरपत्रक रदद करण्यात येईल व जमा केलेली रक्कम परत केली जाणार नाही.

8. खरेदीदारास खरेदी रकमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यातून कोणतीही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र खरेदीदारास मिळणार नाही.

9.. विकी मुल्यावर नियमानुसार सेवा व वस्तू कर (जी.एस.टी ) भरण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

10. खरेदी केलेल्या झेरॉक्स मशिन स्वतःच्या जबाबदारीवर घेवून जाव्या लागतील. त्याकरीता वाहतूक खर्च वा अन्य रक्कम कार्यालयाकडून उपलब्ध केली जाणार नाही. तसेच झेरॉक्स मशिन ज्या स्थितीत ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणाहून ताब्यात देण्यात येतील.

12. खरेदी प्रकियेबाबत न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याचे क्षेत्र उस्मानाबाद येथे राहील.

याची एक प्रत माहीती व योग्य त्या कार्यवाहीकरीता–

- सहा. अधिक्षक,रोविले विभाग,जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद.

## झेरॉक्स मशिनची यादी

| अ.क. | न्यायालयाचे नांव | मशिनची संख्या | मशिनचे वर्णन | मुळ किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | अप्पर जिल्हा न्यायालय,उमरगा | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |
| 02 | सह दिवाणी न्यायालय,क.स्तर,उमरगा | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |
| 03 | दिवाणी न्यायालय,क.स्तर,तुळजापूर | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |
| 04 | दिवाणी न्यायालय,क.स्तर,लोहारा | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |
| 05 | सह दिवाणी न्यायालय,क.स्तर,भूम | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |
| 06 | सह दिवाणी न्यायालय,क.स्तर,परंडा | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |
| 07 | मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय,उस्मानाबाद | 01 | शार्प अेआर 2053ई | 69,355/- |